# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे.

## सेतू-अभ्यास पूर्व चाचणी

## विषय – मराठी

इयत्ता : तिसरी गुण १५

विद्यार्थ्यांचे नाव :----------------------------------------------------------------

प्रश्न १)लक्षपूर्वक ऐक व शब्द वहीत लिही. गुण २

( श्रुतलेखनासाठी दोन शब्द सांगावेत ,जसे की चुंबक,जादूगार,त्याच्या,साऱ्या)

प्रश्न २) खालील वाक्य नीट वाच व योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही. गुण १

काका मामा काकी काकू गावाहून आले

प्रश्न ३ ) पुढील चित्राचे निरीक्षण करून पाच-सहा वाक्यात वर्णन कर.५ गुण



## प्रश्न ४) पुढीलउतारा वाचून पुढील प्रश्नांची उत्तरे सांग/लिही ? ४ गुण

घटक ३

### कोकमचे सरबत

काका काल कोकणातून आला. काकाने कोकमचे सरबत आणले. लाल लाल दाट सरबताची बाटली मीनाला फारच आवडली. लगेच तिने चार कप पाणी घेतले. सरबत बनविले. आईला एक कप दिले आणि बाबाला एक कप दिले. दोघांनाही सरबत फारच आवडले. राहिलेले सगळे सरबत मीनाने घेतले. कारण काकाला कोकमचे सरबत आवडतच नाही.

मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –
१) कशाचे सरबत बनवले?
२) काका कुठून आला?
३) मीनाने किती कप सरबत बनविले?
४) मीनाला किती कप सरबत प्यायला मिळाले?

टीप :आमसूल म्हणजे कोकम या झाडाचे लालसर रंगाचे फळ. ते खूप आंबट असते. कोकणात आमसूलाचा उपयोग आमटी, भाजीत टाकण्यासाठी करतात.

## प्रश्न५) चौकटीतून अर्थपूर्ण शब्द शोधून लिही ? गुण ३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दो | ड | का | मा | बां |
| कौ | ला | रू | सा | ग |
| सै | ल | शे | ग | डी |
| नि | ळा | पू | र | मा |
| क | पा | ट | के | ळी |

__ ______________ ______________

__ ______________ ______________